MHSN010035502022

**फौजदारी किरकोळ अर्ज १८३/२०२२ मधील  निशाणी १ वरील आदेश**
( राजेंद्र मधुकर देवल वगैरे वि. महाराष्ट्र सरकार )

*****

१. अर्जदारांनी सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४०८ अन्वये, नियमित फौजदारी खटला नं.५६/२०१२, ६२/२०१२, ७३/२०१२ व १९५/२०१२ ही प्रकरणे एकाच न्यायालयात वर्ग होणेकरीता दाखल केलेला आहे.

२. जाबदारांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन, अर्ज मंजूर करण्यास हरकत नसल्याचे म्हटले आहे.

३. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

४. संगणक प्रणालीवर सदर प्रकरणांची आजची स्थिती पाहता, नियमित फौजदारी खटला नं.५६/२०१२ हे प्रकरण दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज यांचे न्यायालयात, नियमित फौजदारी खटला नं.६२/२०१२ व ७३/२०१२ ही प्रकरणे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज यांचे न्यायालयात व नियमित फौजदारी खटला नं.१९५/२०१२ हे प्रकरण २ रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज यांचे न्यायालयात प्रलंबित आहे.

AJEY SHRIDHAR RAJANDEKAR Digitally signed by AJEY SHRIDHAR RAJANDEKAR

५. सदर प्रकरणांतील आरोपपत्रांच्या प्रतींचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, सदर प्रकरणे ही मिरज अर्बन को.ऑप. बँक मिरज या बँकेच्या अनियमित कर्जाबाबत महाराष्ट्र शासनाने अर्जदार व जाबदार नं.२ ते ९ यांचेविरुध्द दाखल केलेली आहेत. सदर प्रकरणांतील विषय एकच असून फिर्यादी व साक्षीदारही चारही प्रकरणांमध्ये एकच आहेत, त्यामुळे परस्परविरोधी आदेश आणि निकाल टाळण्यासाठी, चारही प्रकरणे एकाच न्यायालयात वर्ग करणे योग्य होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २. | नियमित फौजदारी खटला नं.५६/२०१२ हे प्रकरण दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज यांचे न्यायालयातून तसेच नियमित फौजदारी खटला नं.१९५/२०१२ हे प्रकरण २ रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज यांचे न्यायालयातून काढून घेवून, सदर प्रकरणे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज यांचे न्यायालयात, नियमित फौजदारी खटला नं.६२/२०१२ व ७३/२०१२ या प्रकरणांसोबत चालविणेसाठी व कायदयानुसार निकाली करण्यासाठी वर्ग करणेत येत आहे. |
| ३. | त्यानुसार संबंधीत न्यायालयांना कळविण्यात यावे. |

AJEY SHRIDHAR RAJANDEKAR
Digitally signed by AJEY SHRIDHAR RAJANDEKAR

सांगली (अ.श्री.राजंदेकर)
दिनांक–११.१०.२०२२. सत्र न्यायाधीश, सांगली.

*****

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer: | H.M.Kshirsagar. |
| Court - | Sessions Judge, Sangli. |
| Date | 11.10.2022. |
| Order signed by the Presiding Officer on - | 11.10.2022. |
| Order uploaded on - | 12.10.2022. |